

HAPPY BIRTHDAY
मधुरिमा
महिलांचे अर्धे आकाश

११. दिव्य मराठी
शुक्रवार • ८ जून २०१२

**टीनएजर्सच्या मनात खूप प्रश्न असतात. त्यांची उत्तरे कोणाला मागावीत, शिक्षक/पालक काय म्हणतील, असे त्यांना वाटत असते. अशा गोंधळलेल्या अवस्थेतील मुलामुलींसाठी हेल्पलाइन चालवताना आलेले हे अनुभव सर्वांच्या उपयोगाचे ठरतील.**

# बिनधास्त बोला, मोकळे व्हा!

हरीश सदानी
मुंबई

'सर, मी नववीत आहे. मला आमच्या वर्गातला एक मुलगा आवडतो. आमचे ४ वेळेला शरीर-संबंध झालेत, दोघांच्या मर्जीनेच. गर्भधारणा होऊ नये म्हणून मी गोळ्या घेतल्या. त्या गोळ्यांचे साइड इफेक्ट्स तर नाही ना होणार माझ्यावर? मला ते प्लीज सांगा...'

'मी २७ वर्षांचा तरुण, अहमदनगरहून बोलतोय. मी इंजिनिअर आहे व गेल्या ५ महिन्यांपासून माझे एका मुलीवर प्रेम आहे. ती हुशार, कर्तृत्ववान आहे; पण आमच्या जातीतली नाही म्हणून आमच्या घरातल्यांचा लग्नाला विरोध आहे. मला कळतच नाहीय की काय करावं. घरातून पळून जाऊन तिच्याशी लग्न करावं की आत्महत्या?'

'मी ३६ वर्षांचा आहे. लघुद्योग होता माझा. तीनेक वर्षं चांगलं चाललं होतं. मागच्या वर्षी मोठं नुकसान झालं उद्योगात. त्यात मी शेअर्समध्ये पैसे गुंतवले होते, त्यात बराच फटका बसला. गेले काही महिने पैशांमुळे घरात सारखे वाद, भांडणं सुरू आहेत. प्रचंड नैराश्य आलंय मला...'

१४ ते ३५ वयोगटातल्या तरुणांची ही मनोगतं... बेधडकपणे, निःसंकोचपणे त्यांनी व्यक्त केली आहेत ती, मी सुरू केलेल्या 'युवा मैत्री' हेल्पलाइनवर. अडीच वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या आगळ्या हेल्पलाइनवर आतापर्यंत ३०००हून अधिक गरजू, त्रस्त तरुणांचे कॉल्स हाताळले गेले आहेत.

या हेल्पलाइनची सुरुवात कशी झाली? मेन् अगेन्स्ट व्हायलन्स अँड अब्युज (मावा) संस्थेतर्फे स्त्री-पुरुष नातेसंबंध, लैंगिकता, हिंसा, आरोग्य या मुद्द्यांवर १८ ते २० वयातल्या मुलग्यांसोबत मी २००६पासून एक उपक्रम राबवीत आहे. 'युवा मैत्री' नावाने सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत पुणे जिल्ह्यातील निवडक महाविद्यालयीन, ग्रामीण शहरी समुदायातील मुलग्यांना समवयीन मुलांशी सशक्त संवाद करण्यासाठी मी प्रशिक्षित केले. प्रशिक्षित संवादक नावीन्यपूर्ण पद्धतीने हजारो युवकांशी सुसंवाद साधू लागले. प्रकल्पाची व्याप्ती हळूहळू वाढून तो मुंबई, सातारा, कोल्हापूर, बुलडाणा, भंडारा या जिल्ह्यांतही आकार घेऊ लागला. आज 'मावा' संस्थेचे सुमारे १०० संवादक राज्यात ठिकठिकाणी जाऊन लिंगसमभाव, लैंगिक आरोग्य व संबंधित संवेदनशील विषयांवर संवाद साधत आहेत.

जडणघडणीच्या कालावधीत (त्यांच्या आयुष्यातील इतरांना बहुधा कमी महत्त्वाचे वाटतील अशा) वरील मुद्द्यांवर तरुण मुला-मुलींना मदतीची, मार्गदर्शनाची गरज असते. एकाच वेळी अनेक प्रश्नांचा कल्लोळ त्यांच्या मनात त्यांना छळत असतो. एका सहृदयी, कुठलाही पूर्वग्रह मनात न ठेवता आपलं म्हणणं ऐकून घेणाऱ्या आप्ताची उणीव त्यांना जाणवत असते. त्यांची नेमकी ही उणीव भरून काढण्यासाठी 'युवा मैत्री' हेल्पलाइन सुरू झाली. ०२२-२६८२६०६२ हा नंबर असलेल्या या हेल्पलाइनवर सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत प्रशिक्षित, स्वयंसेवी संवादक युवकांचे कॉल्स हाताळत असतात. कॉलरचे प्रश्न सोडवणं हा हेल्पलाइनचा मूळ उद्देश नसून कॉलरला प्रश्न स्वतः हाताळण्याइतपत बळ देणं, त्याची प्रश्नाला लढण्याची परिस्थिती सुसह्य करणं हा आहे.

तरुणाईशी संबंधित, १४ ते ३५ वयोगटातील तरुणांना भेडसावणारे विविध प्रकारचे प्रश्न, शंका, मनोगत हेल्पलाइनवर येत आहेत. यात साधारणतः पुढील ६ प्रकार दिसतात.




- **लैंगिकता व लैंगिक आरोग्याशी संबंधित :** वयात येताना जाणवणाऱ्या लैंगिक-शारीरिक-मानसिक प्रश्नांपासून हस्तमैथुन व मासिक पाळीविषयी शंका-गैरसमज; असुरक्षित लैंगिक संबंध ते ओरल सेक्स, समलैंगिकतेविषयी तसेच स्वतःच्या लैंगिक ओळखीबद्दल असणाऱ्या द्वंद्वाबद्दल; ब्लू फिल्म्स पाहिल्याने होणाऱ्या परिणामांविषयी ते लैंगिक आनंद वाढवण्याविषयी वा लैंगिक गैरवर्तनाविषयी; एचआयव्ही चाचणी कुठे करता येईल ते एड्सविषयी उपचार, निगा व काळजीविषयी. सर्वाधिक म्हणजे जवळजवळ ६०% कॉल्स हे लैंगिकतेविषयी येत आहेत.
- **नातेसंबंधाविषयी :** मुलींशी कसं बोलावं, प्रेम कसं व्यक्त करावं, मैत्री कशी करावी ते प्रेमात वा लग्नात नकार कसा व्यक्त करावा, नात्यातील कलह, विवाहपूर्व मार्गदर्शन ते लिव्ह-इन रिलेशनशिपबद्दल.
- **मानसिक ताणतणावाविषयी :** स्पर्धात्मक युगात वावरत असताना व सतत नवनव्या आव्हानांना तोंड देत असताना अनेक पातळ्यांवर येणारे अपयश, नैराश्य, वैफल्यामुळे येणारे ताणतणाव; या ताणतणावांमुळे होणारी व्यसनाधीनता-हिंसेविषयी.
- **अभ्यास व करिअर-मार्गदर्शनाविषयी :** करिअरविषयी अनुरूप पर्याय निवडताना मार्गदर्शन.
- **इतर मुद्द्यांवर व्यक्त होण्याविषयी :** जे पालकांना सांगता-विचारता येत नाही, मित्र-मैत्रिणींशी शेअर करू शकत नाही अशा इतर कुठल्याही गोष्टींविषयी; चुकांची कबुली देण्यासाठी; आपली असुरक्षितता, एकटेपणा, गोंधळ, घुसमट शेअर करण्याविषयी.

फोन करणाऱ्याला त्याचं नाव व इतर कुठलीही वैयक्तिक माहिती विचारली जात नाही. भावनिकदृष्ट्या खचलेल्या व शंका-कुशंकांनी ग्रासलेल्या तरुणांसाठी ही हेल्पलाइन 'इमोशनल फर्स्ट एड'चं काम करते. बिनधास्तपणे बोलण्यासाठी व मोकळे होण्यासाठी, कुठं जायचं हे आता तुम्हाला कळलंय ना?

harsh267@rediffmail.com